
मरण स्वस्त होत आहे
बाबुराव बागूल

# मैदानातील माणसे

पॉवर हाऊसजवळील त्या कळाहीन मैदानावर हिवाळ्यातील प्रसन्न पुनव प्रकाशित प्रसन्नता उधळीत होती आणि थंडी आकाशातील अदृश्य आंधळ्या कुऱ्हाडीसारखी त्या मैदानातील माणसांवर क्रूरपणाने कोसळत होती. त्यांचा कणन्‌कण कचकचा कुरपीत होती. त्यामुळे साधेसे झोपडे बांधण्याची आध्यात्मिक आर्थिक शक्ती नसलेली ती भिकार, बेकार माणसे एकमेकांच्या अंगावरील पांघरुणे पाहून हेवादाव्याने-द्वेषमत्सराने जळफळत होती. नवरा-बायको अंगावरच्या पांघरुणासाठी ओढाताण करीत भांडत होती. पोरे आई-बापाच्या नावाने रडत होती आणि कुत्री अंगात ऊब आणण्यासाठी विव्हळत होती.

तरीही थंडी पिसाळलेल्या हत्तींच्या झुंडीसारखी त्या मैदानात खिंदळत होती. त्या माणसांना पायदळी तुडवत होती. फक्त त्या मैदानातील माणसांप्रमाणे दीनदुबळ्या नसलेल्या डेव्हिडदादाला प्रेमाने कुरवाळत होती. अति माराने, रक्तपाताने बेशुद्ध झालेली त्याची जीवनशक्ती चेतवत होती.

तो एका उंच काळ्या पर्णहीन माडाखालील दाट झुडपात उभा रक्ताने रंगून अस्ताव्यस्त पडला होता. त्याला मारणाऱ्यांनी त्याचा सुरा त्याच्याजवळ टाकून दिलेला होता. तो त्या वस्तीतील दारूवाल्या दादांकडून, त्यांचे साथीदार असलेल्या दारूचा कच्चा माल विकणाऱ्या दुकानदारांकडून पैसे वसूल करून जगत होता. त्याच्या अफाट मागण्यांना नि असह्य मारपिटीला कंटाळून त्या लोकांनी पोलिसांच्या सहमतीने त्याला मरेतोवर मारून व मेला असे समजून त्या मैदानातील झुडपात झोकून दिले होते. थंड वाऱ्याने हळूहळू त्याला शुद्धीवर आणले. तसा तो धडपडत, अंगातील वेदना सहन करीत माडाच्या बुंध्यापर्यंत आला. तेथून पुढे त्याला चालवेना म्हणून तिथेच बसला. त्याने आपली पसरट पुष्ट पाठ माडाला टेकवली होती आणि स्नायूंने

कसलेले पाय माडाच्या बुंध्याच्या उंचवट्यावर पसरलेले होते. त्याच्या डोईचे रक्ताने भरलेले केसांचे झुबके कडक होऊन त्याच्या कानावर, गोऱ्या तांबूस कपाळावर लोंबत होते. खूप मार पडला होता तरी त्याची नम्र न होणारी मान ताठ होती. माणुसकीचा आणि अमाणुसकीचा प्रत्यय देणारी त्याची प्रशस्त छाती थंडीचे तडाखे सहज झेलत होती. त्याच्या डोंगराप्रमाणे दानी नि मानी हातात सुरा होता आणि त्याच्या सहज बसण्यातही वाघाची अहंकारी अक्कड होती. पाण्याने पाप पळवून न्यावे तशी थंडी त्याचा थकवा, ग्लानी पळवून नेत होती आणि त्याचे दुःख देखून देव अथवा दैत्यवत बनणारा स्वभाव आणून देत होती.

आणि त्याच वेळी थंडी मैदानातील इतर दीनदुबळ्यांना धडाधड धडका देत धुमाकूळ घालीत होती. क्षयाने आजारी असलेल्या अब्दुल करीमचा तर कमालीच्या क्रोधाने खुर्दा करीत होती. बेकारीपायी तो रक्तपेढीला रक्त विकून उपाशी तारुण्याच्या भुका भागवत होता. वेश्यांवर, कव्वाल्यांवर मिळालेला पैसा उधळून कफल्लक बनत होता. त्याच्या सापळा झालेल्या शरीरावर थंडी चंडीसारखी थयथय नाचत होती आणि तो मुंडके मुरगळलेल्या कोंबड्याप्रमाणे तडफडत होता. हाता-पायांच्या बोटांतून, रिकाम्या आतड्यांतून वेठ, वेदना उठल्या; रक्त गोठून हाता-पायाला ओढण्या लागल्या म्हणजे तो दणादण हात-पाय आपटत ओरडत होता आणि थंडीचा तडाखा पुन्हा छाती-पोटावर बसू नये म्हणून पाठ वर करत होता; तर कधी बिछान्यात लपावे तसा अंगाखालच्या जमिनीत शिरू बघत होता. पण अंगाखालची माती त्याला पोटात घेत नव्हती, लपवत नव्हती, उघड्यावर पडू देत होती; नि थंडी त्याच्या जिवाची भुकेली होऊन तुटून पडत होती. तसा तो अंगात ऊब आणण्यासाठी अंग घुसळत जिवाचा चोळामोळा करत ओरडत होता, "या खुदा मुझे जीने दो... जीने दो... रहम करो..."

पण अल्ला त्याचे ऐकत नव्हता. रहम करीत नव्हता. एवढेच नव्हे तर त्याच्या आजूबाजूला असलेली माणसे उठत नव्हती. त्याला मरणाच्या मांडीवरून उचलून जवळ घेत नव्हती. कारण थंडीने त्याच्याप्रमाणे तीही हैराण झाली होती. त्याच्याजवळ असलेली झुणकावू-सुपड ही म्हातारी जोडी अंगावर गदळ गोधडी घेऊन झोपली होती. त्याच्या उशापायथ्याला त्यांनी दिवसभर चेंबूरच्या कचरपट्टीवर गोळा केलेल्या विकाऊ कचऱ्याची—चिंध्या, कागद, काच, पत्र्यांची—बारदानात बोचकी होती. त्या दोघांच्या अंगावर एकच गदळ गोधडी होती आणि अब्दुलसारखी तीही थंडीने मेटाकुटीला आली होती. आयुष्यभर एकत्र राहूनही ती थंडीच्या तडाख्याने हाडात कळा उठताच गोधडीची ओढाताण करीत भांडत होती. अति संतापी स्वभावामुळे खेडेगावातून, नोकरीतून, मुंबईच्या चाळीतून हाकललेला, गांजा पिऊन आपली दुःखे विसरू बघणारा सुपड



संतापून बायकोला बडवीत होता आणि आयुष्यभर त्याचा मार खाऊन दुखावलेली झुणकावू चिडत होती; तरी त्याला भिडून थंडी थांबवू बघत होती. अंगावरील गोधडी आवळून धरीत होती. भांडत होती; चिडत होती. म्हाताऱ्याने आयुष्यभर तिच्यावर केलेले जुलूम, दिलेले मार कळवळून त्याला सांगत होती आणि तोही शिव्याशाप देत गुडघ्याचे, कोपरांचे दणके देत होता. अंगावरील गोधडी ओढीत होता.

उशाला रद्दी न्यूज पेपरचे दिंड घेऊन, थंडीने थडाथडा उडत त्यांच्याजवळ सोळा वर्षांचा रामू अंगावर बारदान घेऊन डांबरी खाकी कागद अंथरून झोपला होता. त्याच्या उरावर त्याने दोन्ही हातांनी आवळून धरलेली कागदाची गोणी होती. तो गेल्या चार-पाच वर्षांपासून—आईबाप मेल्यापासून—मुंबईच्या रस्त्यावर, इमारतीच्या कचऱ्याच्या कुंड्यांतून कागद वेचून जगत होता. थंडीच्या तडाख्याने तोही कापत होता. तरी उरावरले कागदी ओझे आवळून धरीत होता. कोणी तरी धटिंगण थंडीतून वाचण्यासाठी आपली कागदी कमाई जाळून टाकील असे त्याला वाटत होते; म्हणून हाता-बोटांना वेठ येत होते तरी तो गोणी मोकळी ठेवत नव्हता. आपण कागद देणार नाही म्हणून कोणी आपल्या डोक्यात धोंडा घालील म्हणून जागा राहत होता. परंतु त्याच्यावर खुनी हल्ला करील असे त्याच्या जवळपास कोणी नव्हते. थंडीने त्याला कोणतेही भलेपण दिसत नव्हते.

त्याच्या पलीकडे एक राक्षसकाय मद्रासी महारोगी अंगावर चिंधाळ्या चादरीचे ओझे घेऊन आणि कुशीत कोवळे कुत्र्याचे पिल्लू घेऊन झोपला होता. ते सारखे कूं कूं करत होते. पांघरुणाबाहेर पडण्याचे प्रयत्न करीत होते. तो सारखा त्याला कवटाळीत होता. थंडीच्या कडाक्याने त्याचे अंग तडकत होते आणि त्याच्याप्रमाणे अंगाने गरगरीत असलेल्या त्याच्या बायकोचा आठव त्याला येत होता. तिच्या संगती चांगली दहा वर्षे भोगलेले सुख त्याला बैचेन करीत होते. आताही आपल्या शेजारी एखादी स्त्री असावी असे त्याला वाटत होते आणि तो कधी प्रेमाने तर कधी आपली बायको कोणासंगत तरी झोपली असेल या संतापजनक आठवणीच्या रागाने त्या कुत्र्याला कवटाळत होता. दाबत होता अन् कुत्रे ओरडू लागताच त्याला समजावत होता. भरल्या संसारातून उठावे लागलेल्या दुःखाने तो अस्वस्थ होऊन गेला होता.

या महारोग्यापासून थोड्याशा दूर अंतरावर एका उतरत्या जागेत असलेल्या झाडोऱ्यातील मधली जागा साफ करून एक भिकारी जोडी राहत होती. आठ-पंधरा दिवसांपूर्वीच तिचा नवरा रस्त्यावर भीक मागत असताना पकडला गेला आणि ती गरोदर असल्यामुळे पोलिसांनी तिला सोडून दिले होते. ती दिवसभर भीक मागून, भिकेचे अन्न खाऊन आपल्या जागेत येऊन पडली होती आणि वाढत्या थंडीने तिच्या

पोटात दुखू लागले होते. पोटातील वेदना या प्रसववेदना आहेत, की थंडीने उठणाऱ्या आहेत हे तिला कळत नव्हते. ती अधूनमधून ओरडत होती आणि तिची रड-ओरड ऐकूनही तिच्यापासून फारशी दूर नसलेली फासेपारध्यांची टोळी दुर्लक्ष करत होती. कारण थंडी त्यांचीही दाणादाण उडवत होती. त्यांच्यातील लहान मुले रडत होती, मुलं पांघरुणासाठी भांडत होती, आणि जवळ पॉवर हाऊस असल्यामुळे आगटी करण्याची परवानगी नसलेली ती माणसे अंगात ऊब आणण्यासाठी नाना यत्न करीत होती. मूलबाळ नसलेली तरुण जोडपी एकमेकांना मिठ्या मारीत होती, काही एकमेकांवर चढून पडत होती, काही मैथुन करीत होती आणि माणसाविरुद्धचे वारे त्यांच्या अंगावरले जुनेर, धोतर ओढून नेऊन त्यांना उघडे पाडत होते.

या टोळीतील आजा-आजीच्या मधे असलेल्या कुंवार सोनाच्या उरी थंडीने वासनेचे वादळ उठवून दिले होते. ती त्या दोघांच्या मधे सारखी चुळबूळ करीत होती आणि तिच्या हालचालीने तिचे आजा-आजी थंडीने अधिक हैराण होत होते. ती दोघेही चिडून ओरडून तिला गप्प पडायला सांगत होती. परंतु तिच्या भीतरी थंडीने उठवून दिलेला मदनवायू तिला स्वस्थ पडू देत नव्हता. तिला अस्वस्थ करून अस्वस्थ हालचाली करायला लावत होता. तोंडावरले पांघरूण काढून तिला तिच्या टोळीतील मदनमग्न जोडप्यांकडे, त्यांच्या कामप्रकारांकडे बघायला लावत होता आणि अंगावर भरपूर कपडा नसलेले ते लोक शरीरघर्षणातून अंगात ऊब आणण्याचे उपाय करीत होते. त्यांचे ते उपाय बघून कुंवार सोनाचे मन चेतत होते, ती वेड्याबहिऱ्यासारखी तोंडावरले पांघरूण काढून आपल्या लोकांकडे बघत होती. आजा-आजीची दमबाजी थंडी विसरत होती. तिच्या या वागण्याने चिडून तिच्या आजाने तिला आपल्यामधून उठवली आणि आपण अंगात ऊब आणण्यासाठी म्हातारीला कडाडून मिठी मारली. त्यांच्या पायथ्याशी बसलेली भांबावलेली सोना थंडीने कुडकुडत कधी एकमेकांना मिठ्या मारणाऱ्या आजा-आजीकडे, तर कधी आपल्या टोळीतील लोकांकडे बघत होती. तशी थंडीने थडथडा उडत तिच्या आजाने आज्ञा केली,

''अशी बसू नको. माझ्या मागं पड. मला दाबून धर.'' आजाच्या हुकमाप्रमाणे तिने त्याला दाबून धरले. तिच्या तरुण देहाच्या लुसलुशीत गरम स्पर्शाने त्याला बरे वाटू लागले. तो म्हातारीला आवळू लागला. त्याच्या स्नायूंचा होणारा थरकाप कमी होऊ लागला आणि त्याचबरोबर त्याच्या शरीरातील कोमेजलेल्या वासनेला वास येऊ लागला. तशी त्याने ओरडून तिला उठायला सांगितले; ती अलग होताच म्हातारीने तिला आपल्या पाठीमागे झोपायला सांगितले. कधी ती, कधी तो — सोनाच्या तरुण देहाचा गरम आडोसा घेऊन थंडी वारीत होते आणि या मेहनतीने ती अधिकच



कामविकल झाली होती. तिला अधिक थंडी वाजू लागली होती. अंगावर जुनेर घेऊन ती तिच्या आजा-आजीपासून दूर होऊन पडली होती. आपल्या लोकांचे कामुक प्रकार पाहून बेचैन होत होती. आणि आपल्या शेजारी तरुण असावा, त्याने आपल्या अंगाशी त्याचे टणक अंग घासावे, आपल्याला कुरवाळावे असे तिला वाटू लागले होते. कोणी तरी आपल्याकडे यावे म्हणून ती आजा-आजीपासून दूर होत होती, परंतु तिच्याकडे कोणी येत नव्हते. कारण तिच्या टोळीतील सर्व पुरुष तिचे चुलतभाऊ होते.

आणि थंडीचे तीव्र तडाखे तिच्यावर कोसळत होते. तिच्या भीतरी उठलेल्या भुकेला उग्र करीत होते. ती सारखी उठून बसत होती आणि अंगावर कपडा घेऊन मैथुन करीत असलेल्या आपल्या लोकांकडे बघत होती. शरमून धरणीला अंग टाकत होती. थंडी वाढत होती आणि भोवतीच्या नंग्या कामुकतेने, थंडीने ती बेभान होऊ लागली. पापास प्रवृत्त झाली होती. कुणाच्या तरी अंथरुणात घुसावे म्हणून ती उठून उभी राहिली. तिला दूर बडबडत असलेला राक्षसकाय मद्रासी महारोगी, त्याच्या बाजूला गोणी घेऊन पडलेला रामू आणि थंडीच्या तडाख्यांनी तडफडणारा अब्दुल दिसत होता. त्या तिघांपैकी कोणाकडे जावे याचा विचार करीत थंडीने थरथरत उभी राहिली असतानाच तिला शुकशुक करीत कोणीतरी हातवारे करीत बोलावत असल्याचे दिसले. ती त्याकडे निरखून पाहू लागली. त्याच्या अंगावरले जाडजूड पांघरूण बघताच आवेगाने ती दोन पावले पुढे जाऊन थांबली. तशी थंडीच्या तडाख्याने नसन्‌नस, स्नायून्‌स्नायू थरथरू लागला. ती भर्रकन् पुढे झाली आणि अंगावर पांघरूण घेऊन उभ्या असलेल्या परपुरुषापुढे जाऊन उभी राहिली आणि तारुण्याने रसरसलेली ही कुमारी जवळ येताच त्याने तिला प्रदीर्घ कव घालून कवेत कसली, अन् तिला घेऊन तो मटकन् खाली बसला. तिच्यासह पांघरुणात गडप झाला.

उंचवट्यावर उंच माडाला टेकून बसलेला डेव्हिड मैदानातील माणसांचे हाल बघत होता. थंडीच्या साठमारीने उलथापालथा होणारा अब्दुल त्याच्या अंत:करणाला पीळ पाडीत होता. झुडपात पडलेल्या गरोदर भिकारणीच्या किंकाळ्या ऐकून त्याच्या काळजाचा थरकाप होत होता. झुनकावू-सुपड या म्हाताऱ्या जोडीची भांडणातून ऐकू येणारी दर्दभरी करुण कहाणी ऐकून त्यांच्या मदतीसाठी त्याचा वाऱ्यागत उदार हात तळमळत होता आणि सोनाचे परपुरुषाशी थंडीमुळे रत होणे बघून तर त्याचा मेंदूच मुका-बहिरा झाला होता. असा तो विचारमग्न होऊन सिग्रेटीमागून सिग्रेटी ओढत होता. तोच त्याच्या कानांवर फासेपारध्यांचा गदारोळ आला, ''सोना कुठं हाय? सोना कुठं हाय?'' आणि ते जोडी दिसेल त्याच्या अंगावरले पांघरूण काढीत मैदानावर फिरत होते. त्या परक्या माणसासंगे आपले सतीत्व सांडून झोपलेली सोना बघताच ते तिला

आणि त्याला मारू लागले. मारून थांबत नव्हते, तर त्या टोळीतील लहान थोर स्त्री-पुरुष जे मिळेल त्याने त्याला मारीत होते. तो माणूस मार खाऊन रक्तबंबाळ झाला होता. धडाधड खाली कोसळत होता, तरी ते सोडत नव्हते आणि ते स्वभावत: क्रूर नसलेले लोक मारण्याच्या मेहनतीने अंगात ऊब येते, जीवशक्ती उत्तेजित होते म्हणून त्याच्या जिवाची पर्वा न करता त्याला मारीत होते.

आणि मजेखातर माणूस मारण्याचा, तीव्र थंडीमुळे आलेला अमानुषपणा पाहून डेव्हिडच्या अंत:करणाचा स्फोट झाला आणि तो अत्यंत संतापाने ओरडला, "ए पारध्यांनो, सोडा त्याला... सोडता की नाही?"

हातातील सुरा आवळून तो चित्त्याप्रमाणे बसल्या जागेवरून उडी मारून त्या लोकांकडे धावू लागला. त्याच्या आवाजातील आगीने, त्याच्या चालण्यातील आक्रमक आवेशाने मजेखातर मारझोड करणारे फासेपारधी भेदरून दूर झाले. त्याच्या हातातील सुरा पाहून सैरावैरा पळू लागले अन् बायका-मुले तर बचावाच्या हाका देत मोठमोठ्याने रडू-ओरडू लागली. त्यांची भित्री पळापळ पाहून तो माघारी फिरला आणि त्याच्या उग्र झालेल्या डोळ्यांत कधी पाठ वर करणारा तर कधी पोट खाली लपवणारा, मोठमोठ्याने ओरडून मरण मागणारा आजारी अब्दुल करीम आला. गपकन खाली वाकून त्याने त्याचे केस पकडून वर उचलून विचारले,

"अरे, तू कोण?"

त्याच्या विजेवत उकळत्या हातस्पर्शाने, आवाजाने भेदरलेला अब्दुल गयावया करीत म्हणाला,

"मैं शायर, जिंदगीभर मैंने औरत और शायरी से मोहब्बत की.... और उसने मुझे ये सजा दी..."

"मतलब?"

"तू मला मारू नको. तुझ्या बेदर्द दुनियेने माझा खून केला. मला मरताना खुदा रहिमला बघून दे. म्हणजे तो मला पुन्हा या दुनियेत पाठवणार नाही. सोड."

त्याचे हे बोलणे ऐकून डेव्हिडचा पंजा सैल झाला. तसा अब्दुल खाली आदळला. बसलेल्या माराने तो आक्रस्ताळेपणाने देवाचे नाव घेऊन टाहो फोडून रडू लागला आणि त्याचा आकान्त पाहून डेव्हिडच्या अंतरी आग नि आसवांचा डोंब उसळू लागला. त्याचा दानशूर हात खसकन खिशात गेला. त्याच्या खिशात सिग्रेट पेटीशिवाय दुसरे काहीच नव्हते. त्याचे प्रखर डोळे अब्दुलसाठी सभोवती मदत शोधत धावू लागले.



रामूच्या उरावरले पोते नि सुपड-झुणकावूच्या उशाशी असलेली बोचकी पाहून त्याने तिकडे धाव घेतली आणि अब्दुलच्या ओरडण्याने सावध झालेल्या रामूने आपली दिवसभराची कागदी कमाई वाचवण्यासाठी आवळून धरली आणि एक तरुण माणूस मरत असतानाही आपले रुपया-आठ आण्याच्या आतबाहेरचे कागद वाचवण्यासाठी दाखवत असलेला क्षुद्रपणा पाहून डेव्हिडला रामूची चीड आली. तो रामूकडे धावला, तसा रामू गोणी अधिक आवळून करुणा भाकू लागला.

"दादा, घेऊ नका. मला बिनआई-बापाच्या पोराला असं पोटावर पाय देऊन मारू नका. उद्या मी खाऊ काय?... त्या म्हातान्याचंच घ्या!" तो तळमळून बोलत होता, रडत होता आणि जोर लावून पोतेही ओढून धरीत होता. त्याने लावलेला जोर मार खाऊन दुखावलेल्या डेव्हिडला असह्य झाला होता. रामूसारख्या भिकार पोराने आपणाशी झोंबावे याची त्याला कमालीची चीड आली. या चिडेच्या आवेशातच जोराने हिसडा देऊन पोते अब्दुलपाशी नेऊन आदळले नि भडभडा मोकळे करून कागदाला काडी लावून तो ओरडला,

"शेक! शेक!!"

आगीच्या धगीने आणि डेव्हिडने अंगावर टाकलेल्या पोत्याने त्याला बरे वाटत होते आणि त्याचबरोबर आपले मरण दूर गेले याचेही त्याला बरे वाटत होते. रामूचे व्याकूळ शब्द त्याच्या कानात गुंजत होते आणि म्हणून अंगावरले पोते काढून टाकावे असे त्याला वाटत होते. परंतु डेव्हिडच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रचंड दाबाने त्याला हे धाडस करवत नव्हते आणि डेव्हिड हताश झालेल्या रामूकडे बघत होता. त्याच्या दीनदुबळ्यांना मदत करणाऱ्या उदार हृदयात रामूच्या केविलवाण्या शब्दांचा बाण रुतून बसला होता. त्या मुलाचे कसे उतराई व्हावे याचा विचार करीत तो तिथेच उभा होता.

त्याचे स्थिर उभे राहणे बघून अब्दुलचे मन बैचेन होत होते; तर थंडीने बेजार झालेल्या सुपड-झुणकावूला तो कधी निघतोय असे झाले होते आणि इतक्यात पोटातील प्राण पृथ्वीवर ठेवण्यासाठी त्या झुडपातील भिकारी स्त्रीने उदंड वेदनेने हंबरडा फोडला. त्या हंबरड्याने डेव्हिड तलम तारेप्रमाणे कंपित झाला. व्याकूळ होऊन आवाजाच्या दिशेने पाहू लागला आणि तो दूर जाता झुणकावू-सुपड जोडी अंगावरील गदळ गोधडी सावरीत शेकाजवळ येऊन बसली. आजूबाजूला पडलेली रामूची सर्व दिवसाची कागदी कमाई वेचून आगीत एक एक करून टाकून शेकू लागली. अन् त्यांची ही दुष्टता पाहून रामूला त्यांच्या डोक्यात दगड घालून ठार करावे अशी चीड आली. दगड शोधण्यासाठी त्याची भित्री नजर आजूबाजूला वळू लागली.

तो दणकेबाज दगड शोधीत होता. अन् म्हातारी जोडी मात्र शेकत होती. ती गरोदर स्त्री लागोपाठ किंकाळ्या ठोकीत होती आणि डेव्हिडची बेभान गती तिच्या प्रत्येक किंकाळीसरशी वाढत होती. प्रत्येक पावलागणीक त्याच्या सर्व शरीरातून कळा उठत होत्या. थंड वाऱ्याने जखमांत ज्वाला भडकत होत्या. तसा तो अधिक वेगाने पुढे जात होता. कळांनी खवळून सुरा आवळीत होता.

आणि मूल पृथ्वीच्या अगदी जवळ आले असताना आपल्याकडे एक उंचापुरा पुरुष वेगाने येत असल्याचे पाहून ती पहिलटकरीण आई शरमेने संकोचू लागली. तिच्या सबंध शरीराला आलेली आगळी अवस्था अवघडू लागली. मुलाची गती गडबडू लागली. मूल बघण्यासाठी, अपार यातनांतून सुटण्यासाठी आतुरलेली ती स्त्री उसळून ओरडली,

"ए—इकडं येऊ नको, मागं फिर..."

तिच्या शब्दातील कारुण्याने, काठिण्याने त्याच्या गतीला दावे घातले. तो थांबला. अन् दुसऱ्या क्षणाला खवळून ओरडला,

"तू कोण रांड मला रोखणारी? अशी पुन्हा बोललीस तर थोबाड तोडून टाकीन..." तो पुढे झाला. तिच्या दोन्ही मांड्यांच्यामध्ये पडलेला लाल पसारा पाहून घृणेने, भयाने रोमांचित होऊन मागे सरला. दोन्ही डोळे झाकून तो तोंड फिरवून शहारे देत माघारी चालू लागला. काही पावले पुढे येताच आपण तिला काहीच मदत करू शकलो नाही ही जाणीव होताच तो जागीच उभा राहून विचार करू लागला. परंतु तिला काय मदत करावी हे त्याला सुचत नव्हते. काही मदत दिसते की काय हे पाहण्यासाठी त्याने डोळे उघडले. अन् समोरचे दुष्ट दृश्य पाहून त्या बाईला मदत देण्याचे विचार कुठच्या कुठे उडून गेले.

समोर थंडीने हैराण झालेली झुणकाबू-सुपड ही म्हातारी जोडी रामूचे उरलेले कागद जाळण्यासाठी हिसकावू पाहत होती. त्याला तडातडा तोडीत होती. त्याच्या नाका-तोंडावर ठोसे हाणत होती आणि त्यांची कलागत क्रूर होऊ लागली होती. थंडीने सैतान बनलेल्या त्या वृद्ध जोडप्याला वठणीवर आणण्यासाठी तो बेभान होऊन पळू लागला. त्याच्या प्रत्येक पावलागणीक त्या तिघांचा झगडा जीवघेऊ स्वरूप धारण करीत होता. त्याच्या दरडावणीला ती थंडीच्या तीव्रतेने तामसी बनलेली म्हातारी जोडी दाद देत नव्हती. उलट तो जवळ यायच्या आत कागद हिसकावून घेण्यासाठी चार हातांनी त्याच्यावर हल्ले करीत होती. त्या दोघांनी त्याला मघाच्या मारामारीसारखे सहजासहजी ठार मारू नये म्हणून तो वाटेत येतील त्यांना तुडवत धावत होता आणि



त्याच्या हातातील सुरा पाहून पायाखाली चिरडलेला माणूस चरफडत गप पडून राहत होता. आणि त्याच वेळी ती म्हातारी जोडी रामूवर मात करून त्याच्या उशाचे रद्दी न्यूज पेपरचे दिंड नि त्याने अंथरलेला डांबरी खाकी कागद घेऊन जाळाकडे वळली होती. रामूने चटकन मोठा धोंडा उचलून म्हाताऱ्याच्या मागे असलेल्या म्हातारीच्या डोक्यात घातला. त्या दणक्यासरशी म्हातारी खाली आदळली आणि पडलेल्या म्हातारीला बघण्याचे सोडून म्हाताऱ्याने रामूवर चाल केली. त्याच्या येण्यातील खुनशीपणा बघून रामू घाबरून मागे सरला आणि दोन धोंडे उचलून ताठ उभा राहिला.

म्हातारा जरासा जरी पुढे आला असता तरी भित्र्या रामूने त्याच्या डोक्याच्या, तोंडाच्या चिंधड्या उडवल्या असत्या, एवढा तो चिडला होता. भ्यालेला होता. भित्रा माणूस भयापोटी भयंकर कृत्य सहजासहजी करून उठतो हे माहीत असल्यामुळे आणि या कोवळ्या तरुणाचे आयुष्य आपल्याप्रमाणे तुरुंगात किडू नये म्हणून डेव्हिडने कमालीच्या कळवळ्याने डरकाळी फोडली,

"ये पोऱ्या, टाक, टाक दगड खाली. टाकतोस का देऊ आरपार ठेवून...."

रामूने घाबरून हातातील दगड खाली टाकले. अन् म्हाताऱ्याचा मार खाण्यासाठी म्हातारीवर लक्ष टाकले. म्हातारीचे डोळे रक्ताने लालभडक झाले होते. तिच्या डोईवरला, पाठीवरला पदर रक्ताने लाल होत चालला होता. अन् ते रक्त बघून रामू डेव्हिडकडे तोंड करून, गळा काढून रडू लागला. त्या अनाथ अश्राप मुलाचे आसू पाहून त्याला छातीशी कवटाळावे असे डेव्हिडला वाटू लागले. तो ख्रिस्ताप्रमाणे सदय कव पसरून पुढे झाला आणि त्याच वेळी त्याच्या कानावर सूर भिजली सतेजदार साद आली... 'ट्यॅह...ट्यॅह...!'

आणि हे लहान मुलाचे हळवे रडे ऐकून त्याच्या अंत:करणात खळबळ होऊ लागली. त्या लहान मुलाला बघण्याची, त्याचे लालभडक फुलासारखे तोंड पाहण्याची अनिवार इच्छा त्याला रामूजवळ जाऊ देईना. त्याला मागे ओढू लागली. अंतरीची अस्वस्थता वाढवू लागली. त्याने रामूला कवटाळण्यासाठी उभारलेले हात चटकन खाली केले अन् तो काळविटासारखा मान-डोळे ताठ करून, कान टवकारून लहान मुलाचे कर्णमधुर रडे ऐकण्यासाठी उभा राहिला. पण बराच वेळ झाला तरी त्याच्या कानावर रडे येत नव्हते. तशी त्या मैदानातील माणसांतील अफाट अमानुषता पाहून भांबावलेल्या त्याच्या डोक्यातून संशयाचे सुरुंग फुटू लागले... 'मूल रडत का नाही? की त्याच्या आईने थंडीच्या तडाख्याने पशू होऊन मांजरीप्रमाणे मटकावून टाकले?... का पापाचा पुरावा नष्ट करावा म्हणून मारून टाकले....?'

या संशयाने तो अधिकच अस्वस्थ झाला, भांबावून गेला अन् रामूकडे पाठ करून तो बेचैनपणे चालू लागला. त्याच्या कवेत पडून आपला दु:खभार कमी करू बघणारा रामू त्याचे दूर जाणे बघून दु:खित झाला. दीनवाण्या डोळ्यांनी त्याच्या वेगवान चालीकडे बघून आसवे गाळू लागला व माणुसकीच्या जोरदार झटक्यांनी बेताल झालेला डेव्हिड थंडीच्या तडाख्यांनी त्या बाईला वाईट बुद्धी सुचू नये म्हणून, तिने त्या पोराला दु:खाने दिवानी होऊन मारू नये म्हणून दिसेल त्या माणसाच्या अंगावरले पांघरूण उचलून पुढे जात होता. उघडा पडलेला तो माणूस पिसाळून उठत होता. परंतु त्याच्या हातातील क्रूर, कठोर सुरा पाहून आणि त्याच्या पल्लेदार शरीराच्या आवेशपूर्ण हालचाली बघून थंडीने तडफडत, चाचपडत होता आणि हर्षवायू झाल्यासारखा डेव्हिड उन्मत्तपणे ओरडत होता,

"उठा! बाय बाळंत झालीय.... अशीच खिस्तजन्माची वेळ होती...

आपण काय बोलतो आहोत, काय करत आहोत याचे त्याला भान नव्हते. तो ओरडत होता. दिसेल त्याचे पांघरूण ओढून खांद्यावर टाकत होता. वाटेत आडवा येईल त्याला बेदरकारपणे तुडवत होता आणि अवघ्या मैदानात हाहाकार उठवत तो महाकाय मद्रासी महारोग्याजवळ आला. त्या वेळी महारोगी त्या कुत्र्याच्या पिल्लाला आपली घवघवीत अंगाची पत्नी समजून, रंगात येऊन पटापटा मुके घेत होता; त्याला कुरवाळत होता आणि त्याच वेळी डेव्हिडने त्याच्या अंगावरले घाण वास मारणारे पांघरूण उचलून खांद्यावर टाकले नि त्या महारोग्याचे पाय तुडवत पुढे झाला.

रंगाचा बेरंग झाल्याने, थंडीच्या तडाख्याने आणि सडलेल्या पायावर त्याच्या बुटांचा वजनदार पाय पडल्याने तो महारोगी रागाने बेभान होऊन उशाला म्हणून घेतलेली दगडी तळी हातात घेऊन उभा राहिला आणि आईवरून एक शिवी हासडून तो डेव्हिडच्या अंगावर धावला.

क्षुल्लक माणूस असा अंगावर आल्याचा आणि आईवर शिवी दिल्याचा अनुभव नसलेला डेव्हिड गर्रकन मागे वळला. डाव्या छातीतून उजव्या कुशीपर्यंत सहजपणे आरपार चालणारा चाकू सावरून महारोग्यावर धावला. त्याच्या डोळ्यातील जळजळीत चमक बघून महारोगी मागे सरला. त्या महारोग्याचा सुजलेला विद्रूप चेहरा बघून त्याच्या मनाचा जुगुप्सेने ताबा घेतला नि त्याच्या सडक्या रक्तात सुरा बुडवण्याची किळस वाटून हात खाली करून, तुच्छतेने थुंकून डेव्हिड माघारी वळला; चालू लागला.



त्याच्या चालण्यातील हत्तीची ऐट बघून, त्याचे लंबेचौडे कसलेले सुंदर शरीर बघून महारोग्याचे ऊर ईर्ष्येने जळून खाक झाले. त्याने दाखवलेल्या तुच्छतेने त्याला डेव्हिडचा जीव घ्यावासा वाटू लागला आणि डेव्हिडने जेव्हा तुच्छतेने खांद्यावरले ओझे भिरकावून दिले तेव्हा रागाने आंधळा होऊन त्याने हातात घेतलेली तळी तळतळून डेव्हिडच्या डोक्यात घातली. तसा सकाळी बसलेल्या माराने, खूप रक्त जाऊन हल्लख झालेला, केवळ आत्मिक बळावर उन्मत्त झालेला डेव्हिड खाली कोसळला. त्यासरशी त्याच्यामुळे थंडीचे तडाखे खाऊन माणसातून उठलेली धुळीतील माणसे त्याच्यावर तुटून पडली. त्याला मारण्याच्या मेहनतीने अंगात ऊब, आनंद निर्माण करू लागली.

गेली कैक वर्षं दादागिरी करूनही अग्नीप्रमाणे अस्पृश्य राहिलेला डेव्हिड त्या मैदानातील माणसांचा मार खात होता. धुळीत पडलेल्या दगडी देवाप्रमाणे तो रक्ताने लाल झाला होता, निपचित पडला होता आणि त्याला मारण्याच्या मेहनतीने उत्तेजित, उल्हसित झालेला प्रत्येक माणूस त्याने भिरकावून दिलेल्या बोजातील आपले जुनेपुराणे धोतर, लुगडे, चादर घेण्यासाठी कुत्र्याच्या लुळकुंडीप्रमाणे आपसात भांडत, धक्काबुक्के देत अंथरुणाकडे ओरडत जात होता. आणि ती झाडोऱ्यात बाळंत झालेली तरुण माता रक्ताने भरलेली नेसू आणि इतर फडकी, नाळ वगैरे पुरण्यासाठी धारदार दगडाने खड्डा खणण्याची खटपट करीत होती आणि थंडी अधिकच तीव्र होत चालली होती. त्या मैदानातील माणसांच्या उरात वळवळणाऱ्या द्वेष-मत्सराला खतपाणी घालत होती. त्यांना माणसातून उठवू बघत होती...!

❑❑❑